MHGA040001152020

# न्यायालय विद्यमान दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर), आरमोरी, जिल्हा — गडचिरोली.

## नियमीत दिवाणी दावा क्र.५/२०२०
**CNR-MHGA04-000115-2020**

देवानंद नामदेव जांभुळकर
वय— ४५ वर्षे, धंदा — नोकरी,
राह. सुकाळा,
तालुका — आरमोरी, जिल्हा — गडचिरोली.
ह.मु. पि.एन. मेश्राम यांचे घरी
रामनगर वार्ड, गडचिरोली .... **वादी**

— वि रु द्ध —

१. ईश्वर लहानु मडावी,
वय— ५५ वर्षे, धंदा —शेती,

२. नानाजी तुळशिराम कन्नाके,
वय— ६० वर्षे, धंदा —शेती.
दोन्ही राह. सुकाळा,
तालुका — आरमोरी, जिल्हा — गडचिरोली. .... **प्रतिवादी**

.......................................................................................

नि.दि.दा.क्र.५/२०२०
देवानंद+१ —वि—ईश्वर+१
CNR-MHGA040001152020

## निशाणी क्र.५ खालील आदेश

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज, दाव्यातील वादग्रस्त मिळकतीवर प्रतिवादी यांनी स्वत: अगर ईतरांमार्फत वाद मिळकतीच्या पुर्वेकडील सुकाळा गावात जाणा—या डांबरी रस्त्यालगतचे जागेवर विरांगणा राणी दुर्गावती मुर्तीच्या स्थापनेकरीता कोणतेही बांधकाम करु नये, असा प्रतिवादीविरुध्द तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश व्हावा यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे थोडक्यात कथन असे की, वादी हा मौजा—सुकाळा, ता. आरमोरी, जि.गडचिरोली येथील रहिवासी असुन नोकरी निमीत्ताने सद्या रामनगर, गडचिरोली येथे वास्तव्यास आहे. वादीचे वडील नामदेव निळु जांभुळकर हे दि.८.१२. २०१० रोजी मरण पावले. तसेच आई शोभा नामदेव जांभुळकर ही दि.१.१२.२०१९ रोजी मरण पावली. वादीचा भाउ नितीप्रसाद जांभुळकर हा शास्त्रज्ञ म्हणुन कटक, राज्य ओरीसा येथे कार्यरत आहे. तसेच बहिन सुधाताई बोरकर हिचे लग्न झाले असुन ती तलाठी म्हणुन मौजा—कढोली, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली येथे कार्यरत आहे. प्रतिवादी क्र.१ व २ हे मौजा सुकाळा, ता. आरमोरी, जि.गडचिरोली येथील रहिवासी आहेत व ते आदिवासी समाजाचे आहेत.

३. वादीची मौजा—सुकाळा, मोहझरी, ता. आरमोरी, जि.गडचिरोली येथे वडीलोपार्जीत भु.क्र.२, ० हे.२४ आर. ही शेतजमीन आहे. वादी व त्यांचे कुटूंब बाहेरगावी असल्याचा फायदा घेवुन प्रतिवादी यांनी मौजा— सुकाळा येथे त्यांच्या समाजामार्फत विरांगणा राणी दुर्गावतीच्या मुर्तीची स्थापना करण्याच्या उद्देशाने वादीच्या वादमिळकतीच्या पुर्वेस डांबरी रस्त्याला लागुन १५ **x** १५ **=** २२५ येवढया जागेवर अतिक्रमण करुन ओटयाचे बांधकाम केले आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादींची भेट घेवुन

त्यांचे मिळकतीवरील केलेले बांधकाम काढुन टाकण्यास विनंती केली परंतु प्रतिवादींनी कोणताही प्रतिसाद दिला नाही तसेच धमकी देवुन मुर्तीची स्थापना करणार असल्याचे सांगीतले. त्यामुळे वादीने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. प्रतिवादींनी निशाणी क्र.१६ येथे लेखी बयाण दाखल केले आहे. तसेच नि.क्र.१७ येथे लेखी बयाण हे नि.क्र.५ वरील दिलेल्या अर्जाला उत्तर समजण्यात यावे अशी पुरसीस दिलेली आहे. प्रतिवादी यांनी असे विशेष कथन केले आहे की, प्रतिवादी मौजा सुकाळा येथील गोंडवाना समाज समितीचे सदस्य असुन ते सदर समितीच्या कोणत्याही पदावर नाहीत. दोन वर्षापुर्वी समाजाच्या लोकांनी गावाच्या प्रवेशद्वाराजवळ व डांबरी रस्त्याला लागून असलेल्या हनुमान मंदिराजवळ (हात पंपाजवळ) राणी दुर्गावतीच्या पुतळयाची स्थापना करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे डांबरी रस्त्याला लागून असलेल्या आबादीच्या जागेत समाजातर्फे ओटयाचे बांधकाम करण्यात आले. सदर बांधकाम केलेल्या जागेशी वादीचा कोणताही संबध नसतांना तसेच सदर बांधकाम हे आबादीच्या जागेस असतांना वादीने दि.३ मार्च २०१९ रोजी पोलीस स्टेशन, आरमोरी यांच्याकडे तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन पोलीस निरीक्षक श्री. राठोड यांनी मौका चौकशी केली व बांधकाम केलेला ओटा हा वादीच्या जागेवर नसल्याचे स्पष्टपणे त्यांना आढळले व त्यांनी वादीला प्रथम त्यांची जागा मोजुन घेण्यास सांगीतले. तसेच प्रतिवादीचे समाजाच्या लोकांना तात्काळ मुर्तीची स्थापना करु नका असे सांगीतले. त्यावेळेस प्रतिवादींनी सदर बांधलेल्या चबुत—यावर मुर्तीची स्थापना केली नाही. वादीने त्यानंतर जागेची मोजणी केली नाही. त्यानंतर समाजाच्या लोकांनी बांधलेल्या चबुत—यावर राणी दुर्गावती मुर्तीची स्थापना केली व मुर्तीचे अनावर दि.१.३.२०२० रोजी करण्याचे ठरविले. त्यासबंधाने दि. १३.१.२०२० रोजी पोलीस स्टेशन, आरमोरी येथे समाजातर्फे पत्राव्दारे माहिती देण्यात आली.

५. प्रतिवादीचे असे देखील कथन आहे की, चबुत—याचे बांधकाम हे झालेले आहे. तथापी, वादीने वाद उत्पन्न केल्यामुळे मुर्तीची स्थापना केली नव्हती. मुर्ती स्थापन केलेल्या जागेशी वादींचा काहीही संबध नसतांना वादी अडवणुकीचे धोरण अवलंबीत असल्याने प्रतिवादींनी सदर चबुत—यावर मुर्तीची स्थापना केली. रस्त्यावरची जागा बळकाविण्याच्या हेतुने वादीने जाणुनबुजुण खोटा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी

वादीची उर्वरीत कथने नाकारलेली आहे. अशाप्रकारे प्रतिवादी यांनी अंतरीम अर्जास आक्षेप घेतलेला आहे.

६. वादीतर्फे व प्रतिवादींतर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील अर्जाच्या अनुषंगाने दस्तऐवजांचे अवलोकन केले. अर्जाच्या निर्णयासाठी विचारात घेतलेले मुद्दे त्यावरील निष्कर्षासह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादीने आपली बाजू प्रथमदर्शनी सिध्द केली आहे काय? | होय |
| २) | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय? | होय |
| ३) | विनंतीप्रमाणे ताकीद न दिल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल काय ? | होय |
| ४) | काय आदेश ? | ...अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा १ ते ४ बाबत :

७. वादी व प्रतिवादी यांनी केलेल्या कथनानुसार व दाखल केलेल्या कागदपत्रांनुसार सदर मुद्दयांचा एकत्रित उहापोह करणे इष्ट होईल. त्यामुळे मी सदर मुद्दयांचा एकत्रित विचार केलेला आहे.

८. या ठिकाणी मला प्रकर्षाने नमुद करावेसे वाटते की, प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार ज्या ठिकाणी मुर्ती स्थापन करण्यासाठी चबुतरा बांधला आहे त्या जागेशी वादीचा काहीही संबध नाही. वादीने सदर कामात ४/१ येथे ७/१२ चा उतारा दाखल केला आहे. सदर उतारा मौजा सुकाळा भु.क्र.२ संदर्भात असुन भोगवटादार सदरी इतर हिस्सेदारांसोबत वादीच्या नावाची नोंद आहे. वादीने भु.क्र.२ चा नकाशा देखील दाखल केला आहे. सदर नकाशाचे अवलोकन केले असता वादमिळकत ही त्रिकोणीय असुन त्याच्या तीन बाजुस रस्ता असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे व एका बाजुस भु.क्र.१ चे

क्षेत्र दिसत आहे. वादीने दिलेल्या चर्तूसिमेप्रमाणे भु.क्र.२ च्या पुर्वेस मौजा– सुकाळा येथे जाणारा डांबरी रस्ता, पश्चिमेस मौजा सुकाळाला लागुन असलेला कच्चा रस्ता, उत्तरेस भु.क्र.१ जगदिश वाढई यांची शेतजमीन व दक्षिणेस मौजा– सुकाळा येथे जाणारा डांबरी रस्ता असे भु.क्र.२ चे चुर्तसिमेचे वर्णन आहे. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे देखील डांबरी रस्त्याला लागुन असलेल्या हनुमान मंदिराजवळ (हात पंपाजवळ) मुर्तीची स्थापना करण्याचे ठरले होते त्याप्रमाणे डांबरी रस्त्याला लागुन असलेल्या आबादीच्या जागेवर ओटयाचे बांधकाम करण्यात आले. याठिकाणी सदर बांधकाम आबादीच्या जागेवर आहे हे दाखविण्यासाठी प्रतिवादींनी मौजा सुकाळा येथील श्री. शालीकराम माहुर्ले, माजी तंटामुक्ती समिती अध्यक्ष, सौ. भाविंद्रा कन्नाके, सरपंच, श्री. धर्नुधर चौधरी, पोलीस पाटील यांची शपथपत्रे दाखल केलेली आहेत. सदर शपथपत्रामध्ये गावाच्या मोहझरीकडे जाणा—या रस्त्याच्या मुख्य प्रवेशव्दाराकडील आबादीचे जागेवर व ग्रामपंचायतीचे कचरा कुंडीला लागून असलेल्या डांबरी रोड जवळील आबादीच्या जागेवर मुर्तीची स्थापना करण्यासाठी चबुतरा बांधला होता. तसेच देवानंद जांभुळकर यांनी त्यांच्या जागेची मोजणी केली नाही. त्यामुळे समितीच्या व समाजाच्या सदस्यांनी ग्रामपंचायतच्या बोरींगला व कचरा कुंडीला लागून असलेल्या आबादीच्या जागेवर मुर्तीची स्थापना केलेली आहे असे शपथपत्रात नमुद केले आहे. प्रतिवादींनी नि.क्र.१८/३ येथे प्रस्तावीत वादासंबधी फोटो दाखल केले आहेत. त्यामध्ये चबुतरा व तथाकथीत मुर्ती आवरणाच्या आत आहे असे दिसते. प्रतिवादींनी १८/४ येथे अनावरण सोहळयाची कार्यक्रम पत्रीका दाखल केली आहे. प्रतिवादीतर्फे दाखल करण्यात आलेल्या शपथपत्रामध्ये शपथकर्त्यांनी केलेल्या कथनांचा विचार करता मुर्तीची स्थापना झालेली आहे असे दिसते.

९. वर उल्लेख केल्याप्रमाणे भु.क्र.२ च्या तिन्ही बाजुला रस्ता व एका बाजुला भु.क्र.१ ची शेतजमीन आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार वादग्रस्त बांधकाम हे रस्त्याच्या कडेला आहे. तर वादीच्या म्हणण्यानुसार वादगस्त बांधकाम वादमिळकतीच्या पुर्वेस रस्त्याच्या डांबरी रस्त्याला लागुन १५ **X** १५ **=** २२५ येवढया जागेवर अतिक्रमण करुन ओटयाचे/तथाकथीत चबुत—याचे बांधकाम प्रतिवादीने केलेले आहे. प्रतिवादीचे असे देखील म्हणणे आहे की, तथाकथीत चबुत—याचे बांधकाम हे डांबरी रस्त्याला लागुन आहे. वादीनी दाखल केलेल्या नकाशावरुन भुमापन क्रमांक २ च्या तिन्ही बाजुला रस्ता

व एका बाजुला भु.क्र.१ आहे. वादगस्त बांधकाम हे वादीच्या म्हणण्यानुसार डांबरी रस्त्यालगत तसेच प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार देखील डांबरी रस्त्याला लागुनच आहे. त्यामुळे सदर तथाकथीत डांबरी रस्त्यालगतची वादगस्त मुर्तीचा चबुत—याची जागा नक्की कोणाची आहे हे प्रथमदर्शनी पाहणे महत्वाचे आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादींनी अतिक्रमण केले आहे. वादी व प्रतिवादींच्या कथनांवरुन वादग्रस्त जागा ही डांबरी रस्त्यालगत आहे. सद्यस्थितीत तरी असे दिसते की, मुर्तीची स्थापना झालेली आहे.

१०. वादीकडे ७/१२ चा उतारा आहे. तसेच वादीच्या शेतमिळकतीच्या तिन्ही बाजुला रस्ता आहे व एका बाजुला शेतजमीन आहे व वादग्रस्त बांधकाम हे वादमिळकतीच्या पुर्वेस रस्त्याच्या डांबरी रस्त्याला लागुन आहे. याउलट प्रतिवादींनी दिलेल्या शपथकर्त्यांच्या म्हणण्यानुसार सदर बांधकाम आबादीच्या जागेत आहे. परंतु प्रतिवादीतर्फे सदर जागा आबादीची (गावच्या वापरासाठी/मोकळी जागा) आहे किंवा कसे हे दाखविणारा शपथपत्रांव्यक्तीरीक्त प्रथमदर्शनी कागदोपत्री पुरावा नाही. वरील कारणांचा विचार करता वादीने प्रथमदर्शनी केस शाबीत केली आहे. अश्या परिस्थीतीत तुर्तातुर्त मनाई आदेश न दिल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल त्यामुळे न्यायाचा तराजू हा वादीच्या बाजुने झुकत आहे. सबब, वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवले आहे व मुद्दा क्र.४ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे—

## **: आदेश :**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी स्वत: अगर त्यांच्यामार्फत इतर कोणीही वादीचे वादमिळकतीचे पुर्वेकडील मौजा— सुकाळा, ता. आरमोरी, जि.गडचिरोली या गावात जाणा—या डांबरी रस्त्यालगतचे १५ **X** १५ **=** २२५ चौ. फुट या जागेवर यापुढे कोणतेही बांधकाम दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश देण्यात येतो.

३. अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसावा.

स्वा/—

आरमोरी.
दिनांक : १७/०६/२०२०.

**(आर.ए.सावंत)**
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
आरमोरी.